संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# शिक्षण व्यवस्थेतच असमानता

भारतामध्ये शिक्षणाचा विचार आणि प्रसार एका मूलभूत सिद्धांतावर झालेला आहे. शिक्षण हे समाजाला किंवा व्यक्तीला केवळ साक्षर करत नाही तर जगण्याच्या समान तत्वांमध्ये मूलभूत चिंतन निर्माण करण्याचा प्रयत्न शिक्षणामुळे घडून येतो. साक्षर झालेला माणूस हा जसा आपल्या हक्कांविषयी आणि अधिकारांविषयी जागृत होतो त्याच वेळेला आपल्याबरोबर असलेला इतर समाज आहे. त्याला देखील तशाच प्रकारच्या समान संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. अशा प्रकारची जाणीव शिक्षणाच्या माध्यमातून अधिक वेगाने विकसित होऊ शकते. म्हणूनच बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा संविधानाची निर्मिती करताना समानता, बंधुता आणि एकता अशा शब्दांचा वापर करताना समाजाचे आर्थिक शोषण टाळायचे असेल तर प्रत्येक व्यक्तीला आर्थिकदृष्ट्यासुद्धा स्वावलंबी होण्याचा किंवा त्याला आत्मनिर्भर करण्याचा विचार बोलून दाखवला होता. व्यक्तीला समानता पाहिजे असते. परंतु ही समानता केवळ कायद्याच्या त्या कागदोपत्री असलेल्या अधिकारांच्या माध्यमातून मिळू शकत नाही. ज्यावेळेला त्याला स्वतःचे व्यक्तिगत आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक समानता जेव्हा मिळू लागते म्हणजे आपल्याला जगण्याच्या किमान सुविधाही मिळत आहेत आणि अन्य लोकांप्रमाणे आपण आपल्याही गरजा व्यवस्थितपणे पूर्ण करू शकतो आहोत असे जेव्हा वाटू लागते किंवा असे जेव्हा आश्वासन मिळते त्या वेळेला त्याला आपण समानतेचा अनुभव घेत आहोत अशी जाणीव होत असते. दुर्दैवाने आज समानता लोकशाहीच्या माध्यमातून आणली जरी गेली असेल तरी अजूनही देशातील ३० कोटी समाज हा आर्थिकदृष्ट्या समानतेने परिपूर्ण झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे आणि दुर्दैवाचा भाग असा आहे की, शिक्षणासारख्या क्षेत्रातच ही असमानता मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या आर्थिक क्षमतेच्या अभावी चांगले किंवा उच्च दर्जाचे शिक्षण घेता येत नाही. उच्च शिक्षण संस्थांमध्ये जाता येत नाही आणि शासनाने सुद्धा देशभरातल्या ज्या काही शिक्षण व्यवस्था उभ्या केल्या आहेत त्यामध्ये सुद्धा असमानतेचे तत्व अंगीकारलेले दिसून येते. याचे अगदी ताजे ढळढळीत उदाहरण म्हणजे दिल्लीतले जवाहरलाल नेहरू विद्यापीठ. जे सध्या अनेक कारणांमुळे नेहमी प्रसिद्धीच्याच झोतात असते.

### जेएनयूमध्ये सर्वाधिक सवलती

देशभरातले हे एकमेव असे विद्यापीठ आहे की, ज्या ठिकाणी शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिशय अल्प दरामध्ये सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तिथले शिक्षणाविषयीचे आणि तिथे दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयी सवलतीचे जर दरपत्रक बघितले तर आपण भारतातल्या कोणत्या भागात राहत आहोत याचा सुद्धा काही वेळेला विसर पडू शकतो. दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीमध्ये असणाऱ्या एका विद्यापीठामध्ये अत्यंत सवलतीच्या दरामध्ये सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपभोगण्याचे स्वातंत्र्य तिथल्या विद्यार्थ्यांना मिळत असते. परंतु हीच सुविधा देशातल्या अन्य कुठल्याही सरकारी विद्यापीठात का नाही त्याचा कोणी कधी विचार करत नाही. याचा दुसरा दुर्दैवाचा भाग असा की, याच जेएनयूमध्ये सातत्याने नको ती तत्व धुडगूस घालताना दिसतात. अगदी राष्ट्रविरोधी कारवाया करण्यापर्यंतसुद्धा तिथली मजल जाते. कारण तिथे येणारे विद्यार्थी हे एका ठराविक वैचारिक चौकटीमध्ये काम करतात आणि तिथे मिळणाऱ्या या सगळ्या सोयी सवलतींचा मनमानी पद्धतीने उपभोग घेत असतात. अनेक विद्यार्थ्यांचा अभ्यास हा कधीही ठरलेल्या मुदतीमध्ये पूर्ण होत नाही व जाणीवपूर्वक दोन-दोन तीन-तीन वर्षे लांबवला जातो. कारण तिथे राहून तिथल्या त्या चळवळींमध्ये भाग घेता येतो. तिथल्या काही विचारांचे पुष्टीकरण तिथे राहून तिथल्या अभ्यास प्रक्रियेमध्ये राहून या सगळ्या गोष्टी करणे शक्य होते आणि दिल्लीसारख्या राजधानीमध्ये इतक्या स्वस्तातल्या सुविधा उपभोगायला मिळतात आणि म्हणून जेएनयू हे विद्यापीठ नेहमी वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत राहिलेले आहे. त्याची प्रसिद्धी आणि प्रचार इतका झाला आहे की, त्या विद्यापीठात थोडा जरी काही प्रकार घडला तरी त्याचे लागलीच देशभर पडसाद उमटतात आणि त्याच्यावर चर्चा होत राहते. असे होण्याचे कारण काय तर देशात इतरसुद्धा विद्यापीठ आहेत ती कधी चर्चेमध्ये येत नसतात. जेएनयू हे विद्यापीठच का नेहमी चर्चेमध्ये येते याचा कधीतरी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

### समानतेचा विचार

जेएनयूमध्ये निवडणुका झाल्या आणि तिथला कुठलातरी एक वैचारिक गट निवडून आला म्हणजे त्या ठिकाणी लोकशाहीचे पुनरुज्जीवन झाले किंवा लोकशाहीचे संरक्षण झाले अशा प्रकारचा तर्क मांडण्याचा अतिशय संकुचित प्रयोग अनेक ठिकाणी केला जातो आणि इथेच शैक्षणिक समानतेचे तत्त्व झुगारले गेले असे म्हणावे लागते. इतर अन्य विद्यापीठांमध्ये लोकशाहीचा गळा दाबला जातो का? की अन्य विद्यापीठांमध्ये लोकशाही टिकलेली नसते. परंतु एका विशिष्ट विद्यापीठाला दिले जाणारे महत्त्व आणि तिथल्या वैचारिक गटाने नेहमी ठेवलेला प्रभाव हे त्याचे प्रमुख कारण असते. तिथल्या विद्यार्थ्यांना दिला जाणाऱ्या सोयी सवलती आणि देशभरातल्या अनेक विद्यापीठांमध्ये नाकारल्या जाणाऱ्या सोयीसुविधा याचा जर विचार केला तर शिक्षण क्षेत्रातली सरकारने जपलेली ही असमानता अत्यंत दुर्दैवी स्वरूपाची ठरते. शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे हे मूलभूत तत्व अंगीकारण्याऐवजी एका विशिष्ट विद्यापीठाला दिली जाणारी ही विशेष प्रकारची वागणूक ही शिक्षणातूनच असमानतेचा विचार रुजवायला कारणीभूत ठरते आणि या असमानतेच्या विचारातूनच मग आंदोलन आणि निदर्शनासारख्या प्रवृत्तींना जागा मिळते. तिथल्या सोयी सवलती कमी करून किंवा तशाच प्रकारच्या सोयी सवलती देशातल्या अन्य पाच-पन्नास विद्यापीठांमध्ये जर दिल्या गेल्या तर आज अनाठायी एकाच विद्यापीठाला मिळणारे महत्त्व कमी होईल आणि शिक्षणामध्ये समानता आणली जाईल. सर्व विद्यार्थ्यांना समान प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे या तत्त्वाचेही पालन होईल म्हणून समानतेचे तत्व शिक्षण संस्थेतून सुरू झाले पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून समानतेचा विचार अधिक वेगाने प्रसारित केला गेला पाहिजे. तरच लोकशाहीचा खऱ्या अर्थाने विकास होईल. अन्यथा आपणच आपल्या लोकशाही व्यवस्थेत दुजाभाव वाढवत आहोत असे म्हणावे लागेल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**न मागता वाट्याला आलेल्या चांगल्या माणसाचं महत्त्व, त्याने पाठ फिरवल्याशिवाय कधीच कळत नाही.**

## पंचांग

**शनिवार ३० मार्च २०२४**
**शक १९४५ शोभननामसंवत्सर**



**फाल्गुन कृष्ण पंचमी**
**नक्षत्र : अनुराधा**

**रवी उदय- ०६-३५**
**रवी अस्त- १८-५१**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० वृश्चिक**

**रंगपंचमी, सुगंधा देवी यात्रा, रेणुका यात्रा, सौंदलगा**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती



### व्हेज मोमोज

★ **साहित्य- कव्हरसाठी** - दीड कप मैदा, १/२ टिस्पून मीठ, २ टिस्पून तेल, **सारण:** १ टेस्पून तेल, १/२ कप कोबी, १/२ कप गाजर, १ भोपळी मिरची, ६-७ लसूण पाकळ्या, १/२ इंच आल्याचा तुकडा, १ हिरवी मिरची - एकदम बारीक चिरून घ्यावे. १/४ टिस्पून मिरपूड, १ टिस्पून सोया सॉस, चवीपुरते मीठ


★ **कृती-** १) कव्हर बनवून घ्यावे. त्यासाठी मैदा, मीठ, तेल एकत्र करून पाणी घालून पीठ मळून घ्यावे. झाकण ठेवून १५-२० मिनिटे ठेवावे. २) सारण बनवण्यासाठी कढईत तेल गरम करावे. त्यात लसूण, आले आणि मिरची परतून घ्यावी. सर्व भाज्या एकत्र घालाव्यात. मोठ्या आचेवर १-२ मिनिटे परताव्यात. त्यात मीठ, मिरपूड आणि सोया सॉस घालावा. तयार सारण एका वाडग्यात काढून घ्यावे. ३) भिजवलेल्या मैद्याचे १ इंचाचे छोटे गोळे करावे. त्याची पातळ पोळी लाटून घ्यावी. मध्यभागी १-२ चमचे सारण ठेवावे. एक कड हातात घेऊन मध्यभागी आणावी. छोट्या-छोट्या चुण्या करून पहिल्या चुणीच्या मागे चिकटवाव्यात. अशाप्रकारे गोल पूर्ण करावा. तसेच करंजीच्या आकारातही मोमोज बनवता येतात. तयार झालेले मोमोज पिळून घेतलेल्या ओल्या कपड्याखाली ठेवावेत. सर्व मोमोज बनवून घ्यावेत. ४) इडली पात्रात पाणी उकळवत ठेवावे. इडली स्टँडला तेलाचा हात लावावा. त्यावर मोमोज ठेवून १०-१२ मिनिटे वाफवून घ्यावे. ५ मिनिटांनी इडली पात्र उघडून मोमोज काढावेत. गरमागरम मोमोज चिली सॉस किंवा शेजवान सॉस बरोबर सर्व्ह करावेत.

टीपा: १) मोमोज उकडण्याऐवजी तळू शकतो. २) सारणामध्ये पनीर, टोफू किंवा नॉन-व्हेजिटेरियन्ससाठी चिकनचे छोटे पिसेस घालू शकतो.



# विराटचे अर्धशतक पण गोलंदाजांची धुलाई कोलकाताचा बंगळुरूवर ७ गडी राखून विजय

**आज आयपीएलच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू विरुद्ध कोलकोता नाईट रायडर्स यांच्यातील सामन्यात कोलकाताने बंगळुरूचा ७ गडी राखून पराभव केला. या सामन्यात सुरुवातीपासूनच कोलकाताच्या फलंदाजांनी बंगळुरूच्या गोलंदाजांची धुलाई करीत षटकार चौकारांचा पाऊस पाडला आणि आरामात सामना जिंकला. कोलकाताच्या विजयामुळे विराट कोहलीचे अर्धशतक वाया गेले.**



■ बंगळुरू

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून बंगळुरू रॉयल चॅलेंजर्सला प्रथम फलंदाजी दिली. हर्षित राणाने कर्णधार डूप्लिसीस याला ८ धावांवर बाद केले. त्यानंतर कोहली आणि ग्रीनने बंगळुरूचा डाव सावरला. दोघांनी ६५ धावांची भागीदारी केली. रसेलने ग्रीनचा ३३ धावांवर त्रिफळा उडवून ही जोडी फोडली.

मॅक्सवेल या सामन्यातही अपयशी ठरला. सुनील नरीनने त्याला २८ धावांवर माघारी पाठवले. त्यानंतर पाठोपाठ २ बळी गेले. पाटीदारला रसेलने ३ धावांवर तंबूत पाठवले तर रावतला हर्षित राणाने ३ धावांवर टिपले. दुसरीकडे विराट कोहलीने आपले अर्धशतक झळकावले. त्याच्या जोडीला दिनेश कार्तिक आल्यावर दोघांनी फटकेबाजी सुरू केली. कार्तिकने ८ चेंडूत ३ षटकार ठोकून २० धावा काढून शेवटच्या चेंडूवर धावचित झाला तर ५९ चेंडूत विराट कोहलीने ४ चौकार व ४ षटकारांच्या सहाय्याने नाबाद ८३ धावा केल्या. अशा तऱ्हेने बंगळुरूने २० षटकात १८२ धावा केल्या. कोलकाताच्या रसेल व राणाने प्रत्येकी २ बळी घेतले. दरम्यान विजयासाठी आवश्यक असलेल्या १८३ धावांचा धावफलक करताना कोलकाताच्या फलंदाजांनी षटकार, चौकाराच्या सहाय्याने धुवाँधार सुरुवात केली. कोलकाताच्या सुनील नरीन व साल्ट या सलामीच्या जोडीने ६.३ षटकात ७५ धावांची भागीदारी केली. अखेर फिरकी गोलंदाज डागरने नरीनला ४७ धावांवर बाद करून ही जोडी फोडली. पाठोपाठ व्ही. कुमारने साल्टचा ३० धावांवर त्रिफळा उडवला.

त्यानंतर व्यंकटेश अय्यर व कर्णधार श्रेयश अय्यर यांची जोडी जमली. या दोघांनी ७५ धावांची भागिदारी केली. व्यंकटेशने ३० चेंडूंत ४ षटकार व ३ चौकारांच्या सहाय्याने ५० धावा केल्या. त्याला यश गोयलने बाद केले. त्यानंतर मात्र श्रेयश नाबाद ३९ व रिंकूसिंग नाबाद ५ यांनी ३ षटके राखून विजयी धावसंख्या गाठली आणि बंगळुरूवर ७ गडी राखून विजय मिळवला.

## राष्ट्रीय किशोरी कबड्डी स्पर्धेसाठी दृष्टी कुंभारची महाराष्ट्र संघात निवड

■ मुंबई



येत्या ३१ मार्चपासून पटणा, बिहार येथे होणाऱ्या ३४ व्या किशोरी गटाच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी, विद्या विकास एज्युकेशन सोसायटी, विक्रोळीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाची दृष्टी नीलेश कुंभार हिची, महाराष्ट्राच्या किशोरी कबड्डी संघात निवड झाली आहे. पुणे फुलगाव येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या ३४ व्या किशोरी अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेत दृष्टीने मुंबई शहर संघांचे प्रतिनिधीत्व केले होते. त्या स्पर्धे नंतर महाराष्ट्र राज्य किशोरी कबड्डी मुलींच्या संभाव्य संघात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाच्या दृष्टी नीलेश कुंभार व पायल सुधाकर कांचन या दोघींची निवड अहमदनगर नेवासा येथे झालेल्या सराव शिबिरासाठी झाली होती.

## दादरमध्ये जावळेंचे दोन दिवस क्रिकेट प्रशिक्षण वर्ग चालणार

**मुंबई-** येत्या २ आणि ३ एप्रिल रोजी नामवंत क्रिकेट प्रशिक्षक गिरीश जावळे यांच्या वतीने वयोगट १२ ते २१ गटातील युवा खेळाडूंसाठी माटुंग्याच्या खालसा महाविद्यालय प्रांगणात क्रिकेट प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत. गेली २५ वर्षे जावळे क्रिकेट प्रशिक्षक म्हणून काम करत आहेत. फलंदाजी, गोलंदाजी, यष्टिरक्षण आणि क्षेत्ररक्षणातील बारकाव्यांची माहिती करून देणे आणि त्यांचा सराव करून घेणे ही गिरीश जावळे यांची खासियत आहे. त्यांचे यंदाचे प्रशिक्षण सत्र मंगळवार २ एप्रिल व बुधवार ३ एप्रिल रोजी १२ ते २१ वर्षे वयोगटातील विद्यार्थांसाठी खालसा महाविद्यालय मैदान, दादर पारसी वसाहत, व्हिजेटीआय, किंग सर्कल जवळ आयोजित केले आहे.

## धुळ्याकडून धाराशिव संघाचा धुव्वा

■ पुणे

रेलिगेशन फेरीत धुळे विरुद्ध धाराशिव यांच्यातील सामन्यात धुळे संघाने धाराशिवचा पराभव करून मोठा विजय मिळवला. तर धुळे संघाच्या दुसऱ्या चढाईत जैवर्धन गिरासेने सुपर रेड करत संघाला ४-० अशी सुरुवात करून दिली. सामन्याच्या चौथ्या मिनिटाला धुळे संघाने धाराशिव संघाला ऑल आऊट करत ९-० अशी आघाडी मिळवली. संघाची आघाडी वाढवली. मध्यंतरापूर्वी पुन्हा एकदा धाराशिव संघाला ऑल आऊट करत आघाडी वाढवली.

फॉर्म क्र. ९१
जाहिरातीचा नमुना
(पहा नियम १९९(४))
हिंदूस्तान डायमंड
कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
(सदस्यांमध्ये स्वेच्छेने समापन)

**सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, उपरोक्त प्रकरणामध्ये अंशदाते / भागधारकांची सभा सोमवार, १५ एप्रिल, २०२४ रोजी दू. १२.३० वाजता व्हीडीयो कॉन्फरन्सींगद्वारे संपन्न होईल.

**कार्यसूची**

कंपनी कायदा, १९५६ च्या सेक्शन ४९६ च्या तरतूदींनुसार परिसमापनाच्या कार्यवाहीच्या, स्थितीच्या संदर्भामध्ये विहीत प्रपत्र आणि समाविष्ट विहीत तपशीलासोबत मागील वर्षातील म्हणजेच २२ फेब्रुवारी, २०२३ ते २१ फेब्रुवारी, २०२४ या कार्यवाही वर्षाच्या दरम्यान समापनाचे कार्य आणि व्यवहार व संचलनाचा लेखाजोखा मांडणे.

प्रॉक्सी फॉर्म परिसमापकाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

सभेमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्राक्सीज परिसमापकाकडे १३ एप्रिल, २०२४ रोजी दु. १२.३० वा. पर्यंत दाखल करणे आवश्यक आहे.

दिनांक: २९ मार्च, २०२४
सही/-
**हिमांशू कपाडीया (परिसमापक)**
कार्यालय क्र. १२, १४ वा मजला, नवजीवन सोसायटी, बिल्डींग क्र. ३, लॅमिंग्टन रोड, मुंबई-४००००८

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
*(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)*
**ज्युपिटर फिनसोल प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | ज्युपिटर फिनसोल प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक | ३१.०८.२००५ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी कायदा, १९५६ अन्वये कंपनी निबंधक, महाराष्ट्र, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U67190MH2005OPC155797 |
| ५. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ए-१५१, नापेरोल टॉवर्स, आर. ए. किडवाई मार्ग, वडाळा पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००३१ |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | २८.०३.२०२४ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. हितेश कोठारी<br>नोंदणी क्र.:<br>IBBI/IPA-002/IP N00324/2017-18/10929<br>१ए, सत्या अपार्टमेन्ट, कांदिवली एमटीएनएल इमारतीसमोर, एस. व्ही. रोड, कांदिवली (प), मुंबई ४०००६७.<br>hiteshkotharics@gmail.com/<br>hiteshkothariipc@gmail.com |
| ८. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २७.०४.२०२४ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **ज्युपिटर फिनसोल प्रायव्हेट लिमिटेड**ने दि. २८ मार्च, २०२४ रोजी ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया सुरु केली आहे.
**ज्युपिटर फिनसोल प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे दि. २७ एप्रिल, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

**दिनांक: ३०.०३.२०२४**
**ठिकाण: मुंबई**
सही/-
**श्री. हितेश कोठारी**
IBBI/IPA-002/IP N00324/2017-18/10929
परिसमापक
ज्युपिटर फिनसोल प्रायव्हेट लिमिटेड

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
*(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)*
**गॅकटेल टर्नकी प्रोजेक्ट्स लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणको (सीडी) चे नाव | गॅकटेल टर्नकी प्रोजेक्ट्स लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १७.०५.१९९५ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक | U40101MH1995PLC088439 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | **नोंद. पत्ता:** ३ रा मजला, प्लॉट क्र. ३/८, हॅमिल्टन हाऊस, जे. एन. हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८, महाराष्ट्र, भारत |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | २७.०३.२०२४ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | २३.०९.२०२४ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | नाव: श्री. कुमार राघवन<br>नोंदणी क्र.<br>IBBI/IPA-001/IP-P01433/2018-2019/12336 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **नोंद. पत्ता:** ए १५ विंडमिल व्हिलेज, अ. क्र. ६१-७५, पौड रोड, बावधन बुद्रुक, पुणे, महाराष्ट्र ४११०२१.<br>**ईमेल आयडी: rkumar56.ip@gmail.com** |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | द्वारा **स्सार्वी रिझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी**<br>पत्ता: बी-६१०, बीएसईएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्थानकासमोर, नवी मुंबई - ४००७०३.<br>वेबसाईट: www.ssarvi.com<br>ईमेल : cirp.gactel@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०४.२०२४ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध: | https://www.ibbi.gov.in/home/downloads<br>लागू नाही. |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी **दि. २७.०३.२०२४** रोजी **गॅकटेल टर्नकी प्रोजेक्ट्स लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
**गॅकटेल टर्नकी प्रोजेक्ट्स लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १०.०४.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

**सही/- श्री. कुमार राघवन**
**नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP-P01433/2018-2019/12336**
**गॅकटेल टर्नकी प्रोजेक्ट्स लिमिटेडच्या प्रकरणामध्ये अंतरिम ठराव व्यावसायिक**
**दिनांक: ३०.०३.२०२४**
**ठिकाण: मुंबई**

**फॉर्म जी**
**मुंबई, महाराष्ट्र येथे गारमेंट मॅन्युफॅक्चरिंगमध्ये कार्यरत**
**मनन अपेरल्स लिमिटेडकरिता**
**स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

| तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन / सीआयएन / एलएलपी क्र. | **मनन अपेरल्स लिमिटेड**<br>सीआयएन: U18100MH2005PLC155531 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | एजे-१२१-१२४, श्री राज लक्ष्मी कमर्शियल कॉम्प्लेक्स, १ ला मजला, काल्हेर, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | https://www.mananapparelsltd.com |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | सर्व जंगम संपत्ती कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये आहे.<br>बहुसंख्य स्थावर अचल संपत्ती मुंबई आणि भिवंडी, महाराष्ट्र येथे आहे. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | उत्पादनाची स्थापित क्षमता १०,८०,००० नग. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | **वित्तीय वर्ष: २०२२-२३**<br>४,८७,३१७ नगांचे उत्पादन केले<br>रु. ३१.११ कोटी |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य कर्मचारी |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेल्या पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएल: | कु. रेखा कांतिलाल शाह,<br>२०१, लीला अपार्टमेन्ट, जेके पॅराडाईस आणि राजानंद कॉम्प्लेक्स, ऑफ एक्सर रोड, एमसीएफ जॉगर्स पार्कजवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०००९२.<br>ईमेल आयडी: mananapparel.cirp@gmail.com |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रतेची उपलब्धता: | आरपीकडे ईमेल mananapparel.cirp@gmail.com द्वारे विनंती केल्यास. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | १३ एप्रिल, २०२४ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | २३ एप्रिल, २०२४ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | २८ एप्रिल, २०२४ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | ०८ मे, २०२४ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १३ मे, २०२४ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १२ जून, २०२४ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | mananapparel.cirp@gmail.com |

टीपा:
१. ठराव योजना सादरीकरण बोली प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींमध्ये कोणत्याही टप्प्यावर बदल/दुरुस्ती/त्याग/रद्द/विस्तारित किंवा सुधारणा होऊ शकेल.
२. अंतरिम ठराव व्यावसायिकांनी, धनको समितीकडून मिळालेल्या सूचनांअंतर्गत, कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही सूचना किंवा दायित्वाशिवाय कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही संभाव्य बोलीदारास स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा अपात्र करण्याचे हक्क राखून ठेवले आहेत.
३. सदर जाहिरातीच्या वेळापत्रकामध्ये कोणताही विस्तार/मजकुरामध्ये कोणताही बदल दुसऱ्या जाहिरातीद्वारे कळविणे आवश्यक नाही, परंतु त्याबाबत इच्छुक अर्जदारास थेट सूचित करण्यात येईल.

कु. रेखा कांतिलाल शाह
IBBI/IPA-001/P-P00776/2017-18/11349
एएफए वैधता ०३.१०.२०२४ पर्यंत
२०१, लीला अपार्टमेन्ट, जेके पॅराडाईस आणि राजानंद कॉम्प्लेक्स, ऑफ एक्सर रोड, एमसीएफ जॉगर्स पार्कजवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०००९२.
मनन अपेरल्स लिमिटेड करिता
दिनांक: २९ मार्च, २०२४, मुंबई